महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**प्रशासकीय परिपत्रक क्र. ७६ दिनांक २०/९/२००६**

विषय : शासनाने अतिसंवेदनशील म्हणुन घोषित केलेल्या जव्हार/डहाणू/तळोदा व धारणी या तालुक्यात/गावात कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी यांना १५ % प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती लागू करणे बाबत.

संदर्भ : १) स.सा.आदेश क्र.१२० (क) दि.१.७.१९८९
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.१.२००३
३) शासनाचे परिपत्रक क्र.आस्था/१७०१/प्र.क्र.११४/भाग-३/का-१५ दि.९.११.२००५.

......

सर्व साधारण आदेश क्र.१२० (क) दिनांक १.७.१९८९ अनुसार दुर्गम भागात व प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.१.२००३ व त्यासोबतच्या सामान्य प्रशासन विभागाचा दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनांनुसार नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील भागात कार्यरत असणा-या पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील कर्मचा-यांना वेळोवेळी प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक क्र.आस्था-१७०१/प्र.क्र.११४/भाग-३/का-१५ दिनांक ९.११.२००५ अन्वये ठाणे जिल्हयातील 'जव्हार' व 'डहाणू', नंदुरबार जिल्हयातील 'तळोदा' आणि अमरावती जिल्हयातील 'धारणी' हे तालुके अति संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

३. शासन परिपत्रक दि.९.११.२००५ अनुसार सदर आदिवासी प्रकल्पक्षेत्रे वाढीव प्रोत्साहन भत्ता मिळण्यासाठी ग्राहय धरण्यात आल्यामुळे या गावात/शहरात मुख्यालय असलेल्या ठिकाणी कार्यरत असणा-या महावितरण कंपनीच्या कर्मचारी/अधिकारी यांना शासनाच्या धर्तीवर वाढीव दराने 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे.

४. सबब, ठाणे जिल्हयातील 'जव्हार' व 'डहाणू', नंदुरबार जिल्हयातील 'तळोदा' आणि अमरावती जिल्हयातील 'धारणी' या ठिकाणी कार्यरत असलेल्या म.रा.वि.वितरण कंपनीच्या कर्मचा-यांना/अधिका-यांना शासन परिपत्रकाच्या तारखेपासून म्हणजे दिनांक ९.११.२००५ पासून शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत वाढीव दराने 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करण्यात येत आहेत.

५. सदर प्रोत्साहन भत्ता संबंधित कर्मचा-यांच्या मूळ वेतनाच्या १५ % दराने परंतु किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- या पैकी कमी असलेल्या रकमे इतका देय होईल.

६. काही कारणांमुळे उपरोक्त गावाच्या/तालुक्याच्या बाहेर इतर कार्यालयामध्ये पदस्थापना झालेल्या/ सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या बाबतीत त्यांना लागू असलेल्या विशिष्ट कालावधीकरिता 'प्रोत्साहन भत्ता' देय करणेबाबत संबंधित कार्यालयांनी परस्परांशी थेट संपर्क साधावा.

७. हे प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक (म.रा.वि.वि.कं.म.) यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन, दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

( सु. य. पाटील )
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वि.कंपनीच्या विभागीय व त्यावरील स्तराच्या कार्यालयांना प्रेषण यादीनुसार.